### गुंतवणूकदारांच्या नातेवाइकांच्या हितासाठी सेबीचे दिलासादायक पाऊल

# गुंतवणूकदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेवर हक्क मिळण्याचा मार्ग झाला सुकर

गुंतवणुकदाराचा मृत्यू झाल्यावर शेअर्ससह त्याच्या साधनांमधून पैसे मिळवण्यासाठी सेबी ने केंद्रीकृत, सोपी आणि जलद यंत्रणा तयार केली आहे, ज्याची अंमलबजावणी जानेवारी 2024 पासून करण्यात आली आहे. हे पाऊल का उचलण्यात आले? याने कोणाला दिलासा मिळेल? ते आपण समजून घेऊया...

आपल्या कुटुंबातील एखाद्या नातेवाईकाचे निधन झाल्यावर आपल्याला दु:ख वाटणे स्वाभाविक आहे, पण त्या नातेवाईकाची शेअर बाजारात चांगली गुंतवणूक असेल, तर त्यांच्या जाण्याच्या दु:खासह शेअर्स, म्युच्युअल फंड इत्यादि साधनांची रक्कम अडकली जाऊ नये आणि त्यावर हक्क मिळवण्यासाठी कुणालाही घाम गाळावा लागू नये किंवा संघर्ष करावा लागू नये त्यासाठी काही व्यावहारिक पावले उचलणे अत्यावश्यक आहे. या बाबीकडे आजतागायत गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही, त्यामुळे मृत गुंतवणूकदारांच्या कुटुंबीयांना त्यांचे हक्क मिळण्यात अडचण निर्माण झाली आहे, त्यांना बराच वेळ काढावा लागत आहे. यासाठी सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ आणि जलद करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

**शेअर्सवरील तुमच्या अधिकारांचे रक्षण करा**

काही काळापासून म्युच्युअल फंड, बँक ठेवी (डिपॉझिट्स), रोखे बाजार-अर्थ बाजार साधनांमधील (मनी मार्केट-फायनान्शिअल मार्केट इन्स्ट्रुमेंट्स) गुंतवणुकीशी संबंधित नॉमिनी नियुक्त करण्यासाठी सेबी आग्रही आहे, याशिवाय सेबीने नॉमिनी नसलेली खाती गोठवण्याचा इशारा सुद्धा दिला आहे, आम्ही या विषयावर आधी येथे चर्चा केली आहे, ज्यामध्ये दावा न केलेले (अनक्लेम्ड) लाभांश, शेअर्स, ठेवी इत्यादींचाही समावेश केला होता. अलीकडेच सेबीने या संदर्भात एक नवीन आणि नाविन्यपूर्ण पाऊल उचलले आहे, ज्याने गुंतवणूकदाराच्या कुटुंबातील सदस्यांना किंवा नॉमिनी-वारसांना गुंतवणुकदाराच्या मृत्यूनंतर हक्क मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर उपाय उपलब्ध करून दिला आहे, त्यामुळे प्रत्येक गुंतवणूकदार-बचतकर्ता आणि त्याच्या कुटुंब-नॉमिनी सदस्यांनी या पायऱ्या समजून घेणे आवश्यक आहे. अर्थात, सेबीचे हे पाऊल त्याच्या नियमना अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गुंतवणूक साधनाला लागू होईल. मग ते शेअर्स असो वा म्युच्युअल फंड. येथे हे लक्षात घ्यावे लागेल की आजही कोट्यावधी रुपयांचे शेअर्स, फंड इत्यादी दावा न केल्यामुळे पडून (अनक्लेम्ड) आहेत, जे काही वर्षांनंतर सरकार-कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडून गुंतवणूकदार संरक्षण निधीमध्ये हस्तांतरित केले जातात, आणि एकदा

ते हस्तांतर झाले की त्यानंतर त्या पैशावर दावा करणे किंवा ते मिळवणे कठीण किंवा जवळजवळ अशक्य होऊन जाईल.

**मृत्यूनंतर केआरएला अहवाल देणे**

सेबीच्या निर्णयानुसार, गुंतवणूकदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत्युची नोंद केव्हायसी नोंदणी एजंसीला (केआरए) केली जाऊ शकते. सेबीने यासाठी एक विशेष केंद्रीकृत यंत्रणा तयार केली आहे. म्हणजे केआरए सह औपचारिकता पूर्ण केल्यानंतर सर्व गुंतवणूक साधने समाविष्ट (कव्हर) केली जातील. मृत गुंतवणूकदाराच्या मालमत्तेवर दावा करण्यासाठी कोणतीही वेगळी प्रक्रिया करावी लागणार नाही. हे रिपोर्टिंग संयुक्त खातेदार, नॉमिनी, कायदेशीर वारस आणि कुटुंबातील सदस्यांद्वारे केले जाऊ शकते. बीएसई आणि एनएसईला गुंतवणूकदाराचे मृत्यू प्रमाणपत्र आणि पॅनकार्ड जमा करून ही माहिती सादर केली जाऊ शकते. ही प्रक्रिया केल्यानंतर मृत गुंतवणूकदाराच्या खात्यात कोणताही डेबिट व्यवहार केला जाऊ शकत नाही, म्हणजेच कोणीही त्यातून लगेच पैसे किंवा शेअर्स काढू शकत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्या खात्याचे सर्व डेबिट व्यवहार अवरोधित (ब्लॉक) केले जातील. मृत्यूच्या पाच दिवसांनंतर, त्याच्या कुटुंबातील सदस्यांना/नॉमिनी व्यक्तींना शेअर हस्तांतरण प्रक्रियेबद्दल माहिती दिली जाईल. त्याचा केव्हायसी कायमस्वरूपी अवरोधित (ब्लॉक) मानला जाईल. ही नवीन यंत्रणा दि. 1 जानेवारी 2024 पासून अंमलात आणली आहे.

जाणकारांचे म्हणणे आहे की आतापर्यंत, गुंतवणुकदाराच्या मृत्यूनंतर विविध गुंतवणूक साधनांचे पैसे मिळण्यासाठी कुठलीच एकसमान प्रक्रिया नव्हती, ज्यामुळे गोंधळ निर्माण व्हायचा आणि बराच वेळ लागायचा. सेबीच्या या पावलांचा परिणाम म्हणून आतापासून हे काम सहज आणि जलद गतीने करता येईल.

**आपण कोणासाठी पैसे कमवतो आणि वाचवतो?**

आपण स्वत:ला हा प्रश्न विचारला पाहिजे की आपण जे पैसे कमवतो, बचत करतो किंवा जमा करतो ते कोणासाठी करतो तसेच वेळोवेळी किंवा दीर्घ मुदतीत चांगला परतावा मिळवण्यासाठी ते कुठे गुंतवले पाहिजेत. आपण आपले आई-वडील, मुले, पती किंवा पत्नी इत्यादी कुटुंबियांवर आपली स्वत:ची संपत्ती सोडू इच्छितो, परंतु जर आपल्याला अचानक काही झाले, आपण मृत्युमुखी पडलो तर? अशा परिस्थितीचा विचार करून आपण गुंतवणुकीसाठी नॉमिनी ठेवला पाहिजे, जेणेकरून आपल्या मृत्यूनंतर ती मालमत्ता नॉमिनीकडे जाऊ शकेल. पण नॉमिनी कोण आहे हे आपल्याला माहीत कसे पडेल? नॉमिनीला आपली मालमत्ता मिळेल, पण तो फक्त तिचा काळजीवाहू किंवा विश्वस्त असेल, मालक नाही. त्यामुळे हे सत्य समजून घेणे आवश्यक आहे की तुमची संपत्ती तुमच्या योग्य कायदेशीर वारसाला सुपूर्द करणे हेच नॉमिनीचे काम आहे.

(टीप- जयेश चितलिया यांचा हा लेख त्यांच्या वैयक्तिक अभ्यासावर आणि विचारांवर आधारित आहे. यासाठी बीएसई कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. वाचकांनी स्वतःच्या सल्लागाराचा सल्ला घेऊन समजून घेऊन अंमलबजावणी करण्याचा विचार करावा.)